**निशाणी क्र. ८२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २६ व २७ यांनी त्यांचेविरुध्द दिनांक २०/०४/२०१५ इ. रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणणेनुसार त्यांना न्यायालयीन कार्यपध्दतीचे ज्ञान नसल्याने त्यांना नोटीस मिळालेनंतर वकीलांची नेमणूक करुन व कागदपत्रे जमा करुन मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. त्यांनी कैफियत देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केली नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायपूर्ततेच्या दृष्टीने त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत स्विकारण्याची विनंती त्यांनी केली आहे.

२. वादी यानी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. सदर अर्ज मंजूर होणेस त्यांची हरकत आहे. सदर प्रतिवादींनी जास्त खर्च देण्याचा आदेश होणेबाबत वादींनी विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र. २६ व २७ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रतिवादी यांनी अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन प्रतिवादींच्या अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादींनी हक्क ठराव घोषणेसाठी व निरंतर मनाईसाठी दावा दाखल केला आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेले वादाचे निराकरण गुणावगुणावर याच दाव्याचेकामी होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. २६ व २७ यांना दाव्यास कैफियत सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत सदर प्रतिवादी यांनी वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## — <u>आदेश</u> —

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २६ व २७ यांना कैफियत दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. २६ व २७ यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम म्हणून रुपये ४००/— दयावी. त्यांनी त्यापैकी रक्कम रुपये २००/— वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : २३/११/२०१६

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.